दूरध्वनी : २५३३ १२११
२५३३ १५९०

# ठाणे महानगरपालिका , ठाणे.

महापालिका भवन , सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग , चंदनवाडी , पांचपाखाडी, ठाणे - ४००६०२
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

## उत्पन्न वाढीसाठी गंभीरपणे काम करा
## सर्व अधिका-यांना महापालिका आयुक्तांची सूचना

ठाणे (15): महापालिकेच्या विविध विभागांनी महसुल वाढीसाठी गंभीरपणे काम करावे अशा कडक सूचना महापालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांनी आज सर्व अधिका-यांना आणि विभागप्रमुखांना दिल्या. यावेळी अतिरिक्त आयुक्त(2) समीर उन्हाळे आणि सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

महापालिका अधिका-यांच्या बैठकीमध्ये आज श्री. जयस्वाल यांनी विविध विभागनिहाय वसुलीचा आढावा घेवून वसुलीचे जे उदिष्ट दिले आहे ते उदिष्ट कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करण्यासाठी गंभीरपणे काम करण्याविषयी स्पष्ट शब्दात सांगितले.

यावेळी श्री. जयस्वाल यांनी मालमत्ता कर वाढविण्यासाठी सर्व सहाय्यक आयुक्त, कार्यकारी अभियंता, कर निरीक्षक यांनी आपल्या स्तरावर वसुलीसाठी कठोर पावले उचलावित असे सांगितले. त्याचप्रमाणे पाणी वसुलीबाबत विभागाने वेळेत पाणी बिलांचे वितरण करून वसुली करावी अशा सक्त सूचना सर्व अधिका-यांना दिल्या.

घनकचरा व्यवस्थापन, अतिक्रमण विभाग यांनी केवळ नोटीसी देवून न थांबता वसुलीही करावी अशा सक्त सूचना देतानाच छोटया-छोटया विभागांनीही त्यांना दिलेले वसुलीचे उदिष्ट पूर्ण करावे असे स्पष्ट केले. यावेळी श्री. जयस्वाल यांनी विविध प्रलंबित प्रकरणांचा, प्रलंबित शासकीय संदर्भांचा आढावा घेवून ती प्रकणे त्वरीत मार्गी लावावित असे सांगितले.